आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र – दुपारी १.३० वाजता

२० सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यसभेत महिला आरक्षणाबाबत चर्चा सुरु / 'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयक मंजूर झाल्यामुळे महिला वर्गात नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असं  प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री जेम्स क्लेव्हरली यांची भारताच्या स्थायी सदस्यत्वासह संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा विस्तार करण्याची मागणी

- विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी सरकारद्वारे "राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांचा नवीन संच जारी

- वाढत्या भारत विरोधी कारवायांच्या पार्श्वभूमीवर कॅनडातील भारतीयांना सावधगिरी बाळगण्याचं परराष्ट्र मंत्रालयाचं आवाहन

**आणि**

- चीनमध्ये हांगझोऊ इथं सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><><>**

लोकसभेत महिला आरक्षणाबाबतचं 'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयक मंजूर झाल्यामुळे महिला वर्गात नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असं प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेच्या सकाळच्या सत्रात

बोलत होते. हा निर्णय देशाला नव्या उंचीवर घेऊन जाईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

हे विधेयक मंजूर करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले. महिला आरक्षण विधेयक मंजूर होणं, हा भारताच्या संसदीय प्रवासातला सुवर्ण क्षण असल्याचं ते म्हणाले.

लोकसभेत काल मतविभागणीनंतर हे विधेयक मंजूर झालं. यामध्ये 454 खासदारांनी विधेयकाच्या बाजूनं, तर दोन खासदारांनी विरोधात मतदान केलं होतं.

**<><><><><><>**

राज्यसभेत आज महिला आरक्षणाबाबतच्या ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ या विधेयकावर चर्चा सुरु आहे. महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतीयांश आरक्षण देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज याबाबतचं घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडलं. लोकसभेत काल हे विधेयक मंजूर झालं होतं. हे विधेयक देशात महिला सक्षमीकरणाला चालना देणार असून, स्वातंत्र्याच्या अमृत काळात भारताला विकसित देश बनवण्याच्या दिशेनं हे महत्वाचं पाऊल ठरेल असा विश्वास मेघवाल यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><><>**

ब्रिटनचे परराष्ट्र सचिव जेम्स क्लेव्हरली यांनी भारताच्या स्थायी सदस्यत्वासह संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा विस्तार करण्याची मागणी केली आहे. ते काल परराष्ट्र संबंध विषयावरच्या एका परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते. आजच्या जगापुढली आव्हानं जन समुदायाशी संबंधित असून,

अशा वेळी जगातल्या उदयोन्मुख शक्तींना हाक दिली पाहिजे, असं ते यावेळी म्हणाले.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वासाठी जेम्स क्लेव्हरली यांनी भारताबरोबरच ब्राझील, जर्मनी आणि जपान या देशांचीही शिफारस केली आहे. आफ्रिकेला जागतिक  व्यासपीठावर मोठी भूमिका मिळायला हवी तसंच  शाश्वत विकास उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेनं सकारात्मक प्रगती व्हायला हवी,  असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारत सरकारनं विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या “राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार” या नावाने राष्ट्रीय पुरस्कारांचा एक नवीन संच जारी केला आहे. राष्ट्रीय विज्ञान पुरस्काराचे उद्दिष्ट शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि नवसंशोधकांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाअधिन नवोपक्रमाच्या विविध क्षेत्रात वैयक्तिकरित्या किंवा संघात केलेल्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी योगदानाची दखल घेणं हा आहे. या पुरस्कारासाठी राष्ट्रीय, राज्य, विविध विद्यापीठे तसेच सेवाभावी संस्थांचे संशोधक आणि भारतीय वंशाचे लोक परदेशात राहून अपवादात्मक योगदान देऊन भारतीय समुदाय किंवा समाजाला लाभ देणारे देखील या  पुरस्कारासाठी पात्र असतील.

**<><><><><>**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयान NEET PG समुपदेशन 2023 साठी वैद्यकीय आणि दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांची  कट-ऑफ टक्केवारी कमी केली आहे. आता सर्व श्रेणींमध्ये पात्रता टक्केवारी 'शून्य' करण्यात आली आहे. वैद्यकीय समुपदेशन समितीने काल जारी केलेल्या अधिसूचनेत ही घोषणा करण्यात आली.

<><><><><><>

भारताच्या जी-२० अध्यक्षतेखाली चौथी आंतरराष्ट्रीय पायाभूत सुविधा कार्यगटाची बैठक, मध्यप्रदेशमध्ये खजुराहो इथं आजपासून सुरू झाली. या दोन दिवसीय बैठकीत ५० पेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. पायाभूत सुविधा गुंतवणुकीच्या विविध पैलूंवर या बैठकीत चर्चा सुरु आहे. मालमत्ता म्हणून पायाभूत सुविधा विकसित करणं, दर्जेदार शहरी पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देणं, इन्फ्राटेक यासारख्या मुद्द्यांचा यात समावेश आहे. अर्थमंत्रालयानं ऑस्ट्रेलिया आणि ब्राझील यांच्या सहयोगानं ही बैठक आयोजित केली आहे.

<><><><><><>

मेरी माटी मेरा देश या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतल्या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याला काल धुळे शहरात प्रारंभ झाला. धुळे महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेलं वाहन विविध भागांमध्ये फिरणार आहे. धुळे शहर वासियांनी या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावं, असं आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी यावेळी केलं ....

**होल्ड बाईट**

<><><><><><>

कॅनडामधील वाढत्या भारतविरोधी कारवाया आणि राजकीयदृष्ट्या माफ केलेले द्वेषपूर्ण गुन्हे आणि गुन्हेगारी हिंसाचार लक्षात घेता सरकारनं तेथील भारतीय नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी एक सल्लागार जारी केला आहे. कॅनडातल्या सर्व भारतीयांना आणि त्या देशात प्रवास करण्याचा विचार करत असलेल्यांना सावधगिरी बाळगण्याचं आवाहन परराष्ट्र मंत्रालयानं  केलं आहे. द्वेषपूर्ण गुन्हे किंवा धमक्या या भारतीय अधिकाऱ्यांवर आणि या कृतीस विरोध दर्शवणाऱ्या भारतीय

समुदायाच्या वर्गांवर केंद्रित करण्यात आले आहेत. अशा घटना घडणाऱ्या स्थळी किंवा राजकीय ठिकाणी प्रवास टाळण्याचा सल्ला मंत्रालयानं दिला आहे.

<><><><><>

भारतीय नौदल आणि रिपब्लिक ऑफ सिंगापूर नौदल यांच्यातला वार्षिक नौदल सागरी सराव आजपासून सुरू होत आहे. दोन टप्प्यांत आयोजित केलेला हा सिमबेक्स सराव या महिन्याच्या २४ तारखेपर्यंत सुरू राहणार आहे.

समुद्र तटीय टप्प्यात व्यावसायिक चर्चा, क्रॉस-डेक भेटी, विषयाशी संबंधित तज्ज्ञांची देवाणघेवाण आणि क्रीडा संबंधित कृती कार्यक्रमांवर चर्चा होईल, तर समुद्रीय टप्प्यात हवाई-संरक्षण तोफ गोळीबार, पाणबुडीविरोधी आणि इतर सागरी अभियानाचा समावेश राहील.

<><><><><>

जम्मू -काश्मिरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल सांगितलं की, केंद्र शासित प्रदेश असलेला जम्मू काश्मीर, क ृषि क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी देशाच्या प्रगतीची कास धरून समान वेगाने बरोबरी करत आहे जम्मू कश्मीरनी मागील तीन वर्षात सर्वात जुने आणि शेतकऱ्यांशी संबंधित वादातीत कायद्यांना काढून टाकल्याचं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इस्रो चांद्रयान-३ च्या लँडर आणि रोव्हरशी संवाद साधण्यासाठी तयार असून, 14 दिवसांनी चंद्रावर सूर्यास्त झाल्यानंतर लँडर आणि रोव्हर निष्क्रिय स्थितीतून सक्रिय स्थितीत आणले जातील.

<><><><><>

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आज ग्रेटर नोएडा इथं उत्तरप्रदेशच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचं उद्घाटन करणार आहेत. येत्या २५ सप्टेंबर पर्यंत चालणारा हा कार्यक्रम नॉलेज पार्क इथल्या इंडिया एक्स्पो मार्ट मध्ये आयोजित करण्यात आला आहे. उत्तरप्रदेशच्या राज्यपाल आनंदी पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उद्योग मंत्री नंद गोपाळ नंदी उद्घाटन समारंभाला उपस्थित राहतील.

वाहन उद्योग, हस्तकला, आरोग्यसेवा, अन्न प्रक्रिया, आणि ई-कॉमर्ससह विविध क्षेत्रांमधले 2 हजारापेक्षा जास्त प्रदर्शक आपली उत्पादनं याठिकाणी प्रदर्शित करतील. मुंबईच्या डबेवाल्यांसह राज्य सरकारचे विभाग आणि संस्था विविध व्यावसायिक उपक्रमांवर माहितीपूर्ण सत्र आयोजित करतील.

**<><><><><>**

चीनमध्ये हांगझोऊ इथं सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा 2023 मध्ये भारतीय महिला क्रिकेट संघानं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. **त्यांचा** मलेशियाविरुद्धचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना आज पावसामुळे रद्द करण्यात आला. भारतीय संघांची क्रमवारी मलेशियापेक्षा वरचढ असल्यामुळे संघाला पुढल्या फेरीत प्रवेश मिळाला. भारतीय महिला क्रिकेट संघ आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदा सहभागी झाला आहे.

**//<><><><><>//**